# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २१/१०/२०२२ (शुक्रवार)**

**(सायंकाळ)**

---

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत दहेगाव रंगारी येथे दि. १९/१०/२२ चे ०४.०० वा. चे सुमारास **आशीष सुनील मोरे(मृतक), वय २२ वर्ष, रा. गुरूदेव कॉलनी दाबा, नागपूर** व त्याचे दोन मित्र असे मिळून रामटेक येथे फिरण्यास गेले होते. त्यादरम्यान तिघे मिळुन संग्रामपुर येथे असलेला नहरावर आंघोळी करीता गेले असता त्यातील मृतक नामे आशीष सुनील मोरे याचा पाय नहराचे चिल्यामध्ये घसरल्याने पाण्यात वाहुन गेला होता. दिनांक २०/०७/२२ ला सकाळी ०७.०० वा. दरम्यान नहरापासुन पाण्यात आशीष याचे प्रेत मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुनील रामाजी मोरे वय ५० वर्ष, रा. गुरूदेव कॉलनी दाबा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सुरू आहे.

### गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत जुनी कन्या शाळा कारोकर चौक सावनेर येथे दि. २०/१०/२२ चे १२.०० वा. दरम्यान फिर्यादी यांचा चुलत पुतण्या नामे **मिथिलेश उर्फ शांतनु अजय उर्फ अनंता पुरुषोत्तम नाईक (मृतक), वय १९ वर्ष, रा. वार्ड क्र. १२, राममंदीर रोड कारोकर चौक, सावनेर** हा दि १७/१०/२०२२ चे १६.०० वा. घरी कोणालाही न सांगता निघून गेला. त्यामुळे हरविलेल्या बाबत त्याचे वडील नामे– अनंता पुरुषोत्तम नाईक यांचे रिपोर्ट वरुन १८/१०/२०२२ रोजी मिसींग क्र ७०.२०२२ नोंद आहे. दि २०/१०/२०२२ चे दुपारी १२.०० वा. सुमारास कारोकार चौक सावनेर येथील जुनी कन्या शाळेच्या पडक्या इमारती मध्ये मृतक मिथिलेश उर्फ शांतनु अजय उर्फ अनंता पुरुषोत्तम नाईक हा निळसर रंगाच्या प्लॅस्टीक रस्सीने गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आला.मृतक कडे कोणत्यातरी मुलाचे उधार घेतलेले पैसे असल्याने त्या उधारीचा पैसे मागण्याचे कारण्यावरुन त्याने गळफास घेवून आत्महत्या केली असावी फिर्यादीचा तोंडी रिपोर्ट वरुन सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मनिष सुरेशराव चित्तेदान, वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र १२, राममंदीर रोड, कारोकर चौक सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा शिंदे मो.नं. ९८२२९३२२५३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर